



Arts and Commerce College Mayani
Est. 1991
Tal-Khatav, Dist. Satara

**Principal**
**Arts and Commerce College**
**Mayani, Tal- Khatav Dist. Satara.**

Arts and Commerce College, Mayani, Tal. Khatav, Dist. Satara
Est. 1991

सकाळ TODAY
सातारा, सोमवार, २४ फेब्रुवारी २०२०
८

# काव्यमैफलीला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## मायणीत युवा साहित्य संमेलन; मान्यवर कवींच्या सहभागाने आली रंगत

**मायणी, ता. २३ :** खुदकन हसविणाऱ्या, डोळ्यांच्या कडा ओलावणाऱ्या, संताप आणणाऱ्या, तर कधी काळजाला भिडणाऱ्या धीरगंभीर कवितांनी येथील काव्यमैफील उत्तरोत्तर रंगत गेली. त्यात साहित्य रसिक अक्षरशः न्हाऊन निघाले.

येथील जगन्नाथराव जाधव स्मृती विज्ञान भवनात कला, वाणिज्य महाविद्यालयातर्फे बारावे युवा ग्रामीण साहित्य संमेलन आयोजिण्यात आले. ज्येष्ठ लेखिका नीलम माणगावे यांच्या अध्यक्षतेखाली व स्वागताध्यक्ष सुरेंद्र गुदगे, उद्घाटक सुधाकर कुबेर, प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी, डॉ. अमोद चोथे, कवयित्री अस्मिता इनामदार आदींच्या उपस्थितीत कवी संमेलन बहरत गेले.

*'तुझ्या मनगटावर दादा बांधिला मी धागा,*
*ठेव काळजात तुझ्या मला थोडी तरी जागा'*



मायणी : कविता सादरीकरण करताना लता ऐवळे. त्या वेळी नीलम माणगावे, कुंदा कांबळे, रंजना सानप, अनुराधा गुरव आदी.
(संजय जगताप : सकाळ छायचित्रसेवा)

या कवयित्री लता ऐवळे यांच्या कवितेने काळजाला तर हात घातलाच; पण कापऱ्या आवाजाने श्रोत्यांच्या डोळे पाणावले. कवी किरण अहिवळे यांनी 'धरण' या कवितेतून धरणग्रस्तांच्या व्यथा मांडल्या. ते म्हणाले,

*''बाप माझा आजा पणजा, उभ्या घामात नाहला*
*रक्ताचं करून शिपान, माळ धोंडा फुलवला*
*काळ्या आईच्या टिळ्याचं भाळावरी गोंदण*
*आमुच्या ऊरावरी तुम्ही बांधिले धरण''*

कवी महेश मोरे 'स्वच्छंदी' यांच्या 'तेच बहुधा प्रेम असावे' या सुश्राव्य गझलेस युवकांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. ते म्हणाले,

*स्वप्नांमध्ये हरवत गेले तेच बहुधा प्रेम असावे*
*वयाबरोबर वाढत गेले तेच बहुधा प्रेम असावे*
*स्पर्श जरी मी केला नाही, या बोटांनी त्या देहाला*
*जे हृदयाला छेडत गेले, तेच बहुधा प्रेम असावे*

याशिवाय कविसंमेलनात कवयित्री कुंदा कांबळे, अनुराधा गुरव (वडूज), रंजना सानप (मायणी), डॉ. महेशकुमार सोनवणे (म्हसवड), प्रकाश शिंदे, विठ्ठल भागवत, डॉ. हेमांगिनी माने (विटा), श्रीमयी दिवटे, अंकुश चव्हाण, अंजली गरवारे, वंदना लिपारे, श्यामसुंदर मिरजकर (मायणी), शिवप्रसाद पवार (चितळी), आनंद बागल (कातरखटाव), चंद्रकांत हुलगे (गारळेवाडी) यांनी आपल्या दर्जेदार रचना सादर केल्या. दरम्यान, उपस्थितांचे स्वागत डॉ. विजया कदम यांनी केले. प्रा. शिवशंकर माळी यांनी आभार मानले.

Principal
Arts and Commerce College
Mayani, Tal- Khatav Dist. Satara.

दै. लोकमत १८/२/२०२०

Arts and Commerce College, Mayani
Est. 1991
Tal. Khatav, Dist. Satara

# लोकसाहित्याचे जतन व्हावे

## विजया पवार : मायणी युवा ग्रामीण साहित्य संमेलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मायणी** : 'लोकसाहित्य म्हणजे पिढ्यान्पिढ्यांनी जपलेले सांस्कृतिक शहाणपण आहे. जात्यावर दळत असताना म्हटल्या गेलेल्या ओव्या किंवा शेतात कष्ट करताना म्हटली गेलेली भलरी गीते यामुळे जुन्या काळात समृद्ध भावविश्वाची निर्मिती होत होती,' असे प्रतिपादन डॉ. विजया पवार यांनी केले.

येथील कला, वाणिज्य महाविद्यालयाने आयोजित केलेल्या युवा ग्रामीण साहित्य संमेलनात 'लोकसाहित्य : एक सांस्कृतिक ठेवा' या विषयावरील साहित्य-चर्चा व कथाकथन दुसरे चर्चासत्र आयोजित केले होते. यावेळी मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव सुधाकर कुबेर, संचालक दिगंबर पिटके, प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी, प्रा. महेशकुमार सोनवणे, कवयित्री लता ऐवळे, कवयित्री कुंदा लोखंडे, बाळासाहेब कांबळे उपस्थित होते.

संदीप कुंभार




मायणी येथील युवा ग्रामीण साहित्य संमेलनात डॉ. विजया पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सुधाकर कुबेर, सर्जेराव खरात उपस्थित होते.

पवार म्हणाल्या, 'लोकगीते, लोककथा, लोकनृत्ये, म्हणी, उखाणे यांमधून लोकसंस्कृतीची निर्मिती होते. लोककथेचे योग्य प्रकारे विश्लेषण केले, तर त्या माध्यमातून लोक समजुती व लोक विश्वास यांच्यावर प्रकाश टाकता येतो. विविध नातेसंबंधातील अनेक पदर, भक्तिभाव व विविध अनुभव व्यक्त करण्यासाठी लोकसाहित्याची निर्मिती झाली. त्याचे जतन करणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे.'

कथाकथन सत्रात कथाकार सर्जेराव खरात म्हणाले, 'जगण्यातील विसंगती नेमकेपणाने टिपली की कथा तयार होते. परस्परांबद्दल आपुलकी आणि विश्वास असणारी ग्रामसंस्कृती कमी होत चालली आहे. थोरामोठ्यांचा धाक, त्यात दडलेले प्रेम दोन्ही कमी होऊ लागले आहे. दुसऱ्याचे दुःख बघून ज्यांचे डोळे पाणावतात, अशी पिढी काळाच्या पडद्याआड चालली आहे. म्हणूनच समाजात अनाचार माजला आहे.'

डॉ. विजया कदम यांनी स्वागत केले. प्रा. शिवशंकर माळी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी आभार मानले.

Principal
Arts and Commerce College
Mayani, Tal- Khatav Dist. Satara.

Arts and Commerce College, Mayani
Est. 1991
Tal- Khatav, Dist. Satara

पुण्य नगरी २

SMART सातारा | सोमवार, १७ फेब्रुवारी २०२०

ग्रामीण

# एकविसाव्या शतकात विद्येची दयनीय अवस्था

## निलम माणगावे : मायणीत ग्रामीण युवा साहित्य संमेलन

**मायणी** : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लिहिण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वाचन व लिखाणातून लिहिण्याची प्रगल्भता येत असते. काय पहावे व काय वाचावे हे महत्त्वाचे आहे. ज्ञानाचा वापर अंधश्रद्धा व स्वार्थासाठी होत असेल तर या ज्ञानाचा उपयोग काय? आंबेडकर, फुले, शाहू महाराज यांनी महाराष्ट्रात मोठे शैक्षणिक कार्य केले आहे. आज एकविसाव्या शतकात फुले, आंबेडकर, शाहू महाराजांनी सांगितलेल्या विद्येची अवस्था भरकटलेल्या अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. आज विद्येत पारंगत होऊन देखील मती माती होत आहे व मातीमोल व विवेकहीन झालेल्या मतीने एवढी गती पकडली आहे की ती स्वतःच्या जात, धर्म, लिंग व विद्येच्या पलिकडे जाऊन बेफाम झाली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक निलम माणगावे यांनी केले.

कला - वाणिज्य महाविद्यालय, मायणी यांच्यावतीने आयोजित बाराव्या ग्रामीण युवा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना निलम माणगावे बोलत होत्या. सदरवेळी मायणी भाग शिक्षण प्रसारक मंड़ळाचे चेअरमन व स्वागताध्यक्ष सुरेंद्र गुदगे, संमेलनाचे उद्घाटक व संस्थेचे संस्थापक सचिव सुधाकर कुबेर, संचालक दिगंबर पिटके, डॉ. विजया पवार (कडेपूर), अर्बन बँकेचे संचालक भाऊसाहेब लादे, प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी आदी उपस्थित होते.

सौ. मानगावे पुढे म्हणाल्या, साहित्य संमेलनाचा उपयोग काय, असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होत असतो. साहित्य संमेलनाच्या माध्यमातून लेखक भेटतात, त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी मिळते. तालुका, जिल्हा वं व शालेय पातळीवर अशा प्रकारच्या संमेलनांचे आयोजन महत्त्वाचे आहे. छोट्या संमेलनांच्या माध्यमातून या हृदयाची भाषा त्या हृदयापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जातो.

सुरेंद्र गुदगे म्हणाले, या महाविद्यालयाच्या माध्यमातून गेली बारा वर्षे सातत्याने साहित्य संमेलनाचे आयोजन होत आहे. ही ग्रामीण भागाच्या दृष्टीने अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. ग्रामीण व दुष्काळी भागात साहित्याची उपलब्धता व त्या साहित्याची खरेदी करण्याबद्दलची आवड कमी असते. मात्र, ग्रामीण भागात अशा प्रकारच्या साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यामुळे ऐकण्याची व वाचनाची आवड निर्माण होऊ लागली आहे.



मायणी : ग्रामीण युवा साहित्य संमेलनात बोलताना निलम माणगावे, व्यासपीठावर मान्यवर.

प्रास्ताविक डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी केले. स्वागत प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. शिवशंकर माळी यांनी केले. आभार प्रा.डॉ. शौकत अली सय्यद यांनी मानले.

दरम्यान साहित्य-चर्चा या दुसऱ्या सत्रात लोकसाहित्य एक संस्कृती ठेवा या विषयावर डॉ. विजया पवार (कराड) यांनी उत्कृष्ट प्रमाणात मांडणी केली, तर कथाकथन सत्रात कुंडल येथील कथाकार सर्जेराव खरात यांच्या सुश्राव्य कथा कथनाने उपस्थितांचे मने जिंकली. काव्य संमेलनात कवयित्री लता ऐवळे (सांगली) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कविसंमेलनात सातारा, सांगली जिल्ह्यातील अनेक कवींनी सहभाग घेऊन आपल्या विविध विषयांवरील कविता अत्यंत प्रभावीपणे मांडून रसिकांची दाद मिळवली.